महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**कार्यालय पोलीस आयुक्त, नागपुर शहर**

**पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाईन्स, नागपुर - ४४०००१**

ई.मेल - cp.nagpur@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. - 0712-2590601

क्रमांक : पोआना/आस्था/सआलि-५/पोशि भरती २४-२५/.लेखी परिक्षा/२०२६-1189/नागपुर शहर दिनांक २०/४/२०२६

**अतितात्काळ / पोलीस भरती प्राधान्य**

## :: प्रसिध्दीपत्रक ::

## पोलीस शिपाई भरती 2024–25

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस भरती 2024–25 मधील **पोलीस शिपाई** यांची एकूण 595 पदे भरण्यासाठी या कार्यालयाने दिनांक 28/10/2025 अन्वये जाहीरात प्रसिध्द केली होती. सदर पदांचे भरती प्रक्रियेत लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा ही रविवार **दिनांक 26/4/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता** खालील नमुद महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

| अ.क. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता |
|---|---|
| 1 | रायसोनी महाविद्यालय, मंगळवारी बाजार चौक, सदर नागपूर. |
| 2 | रामदेवबाबा विद्यापीठ व अभियांत्रिकी महाविद्यालय, रामदेवबाबा टेकडी, पोलीस ठाणे गिटटीखदान समोर, काटोल रोड, नागपूर. |
| 3 | तुळशिराम गायकवाड पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय मोहगाव, वर्धा रोड, नागपूर. |
| 4 | सेंन्ट फ्रान्सीस डी सेल्स (एस.एफ.एस. महाविद्यालय) बालोद्यान गार्डन समोर, सेमिनरी हिल्स, नागपूर. |

लेखी परीक्षेकरीता पात्र असलेल्या उमेदवारांनी **रविवार दिनांक 26/4/2026** रोजी वर नमुद महाविदयालयाचे आवारात **सकाळी 08.00 वाजता** उपस्थित राहावे. **सकाळी 08.00 वाजता** नंतर उशिरा हजर होणा–या उमेदवारांना कुठल्याही परिस्थितीत परिक्षा केन्द्राचे आंत प्रवेश दिला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवाराकरीता लेखी परिक्षेबाबत सविस्तर सुचना www.nagpurpolice.gov.in या कार्यालयाचे संकेतस्थळावर व महाआयटी विभागाचे https://policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्याकरीता उमेदवारांनी संकेतस्थळावर पाहावे.

तरी उमेदवारांनी याबाबत नोंद घेऊन **पोलीस शिपाई** या पदाच्या लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र https://policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत.

लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्राबाबत काही अडी–अडचणी असल्यास कार्यालय पोलीस आयुक्त, नागपुर शहर येथे प्रत्यक्ष येवुन संपर्क साधावा.

Scanned with OKEN Scanner

लेखी परिक्षेकरीता येतांना उमेदवारांनी महाआयटी, मुंबई यांचेकडील लेखी परिक्षेकरीता प्राप्त होणारे प्रवेशपत्र व मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच उमेदवारास प्रवेश देण्यात येईल. वर नमूद दोन्ही प्रवेशपत्र सोबत आणावीत. तसेच ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान कार्ड यापैकी कोणतेही एक मुळ ओळखपत्र आणि उमेदवाराकडे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेल्या फोटोच्या 2 प्रती सोबत **आणणे** अनिवार्य आहे.

लेखी परिक्षेकरीता उमेदवारांना परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी / डिजीटील डायरी / मायक्रोफोन / मायक्रो कॅमेरा डिव्हाईस / कॅल्क्यूलेटर / डिजीटल नोट पॅड / नोट्स पुस्तके / इअरफोन / हिअरिंग एड डिव्हाईस / स्मार्ट वॉचेस / स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच कुठलेही से साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होउ शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवारा आढळुन आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवुन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच उमेदवारांनी परिक्षा केंद्रामध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत त्यांना कुठल्याही परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्राचे बाहेर जाता येणार नाही.

परिक्षा केंद्राच्या आवारात नातेवाईक, मित्रमंडळी, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तिःस प्रवेश दिला जाणार नाही याबाबत सर्व संबधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

परिक्षा केन्द्रावर अथवा परिक्षा केन्द्राच्या परिसरात कुठलही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता परिक्षा केन्द्रावर खोलीनिहाय व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे. तसेच ओळख पटविण्याकरीता प्रत्येक उमेदवाराची बायोमॅट्रीक्स तपासणी घेण्यात येणार असून डमी उमेदवार आढळून आल्यास तसेच परिक्षे दरम्यान गैरवर्तन करतांना आढळून आल्यास उमेदवारास लेखी परिक्षेकरीता अपात्र ठरविण्यात येईल व महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

2/4/26

( नविनचंद्र रेड्डी )
सह पोलीस आयुक्त,
नागपुर शहर

Scanned with OKEN Scanner